INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
ISSN 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# अनुसूचित जमातीतील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील अंधश्रद्धेचा अभ्यास

**सुरेखा रामभाऊ शिंदे**

**DOI Link ::** http://doi-ds.org/doilink/04.2021-21837857/IRJHIS2104004

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशाचा विकास हा केवळ आणि केवळ शिक्षणाद्वारेच होत असतो. देशाची शाश्वत प्रगती त्या देशातील देशाचा मुख्य घटक म्हणजे लोकसंख्या यातून आकार घेत असते. देशातील लोकांनी खरोखरच उच्च दर्जाचे शिक्षण घेतलेले असेल तर त्या देशाची प्रगती आपोआपच होईल यात मात्र काही ही शंका नाही. म्हणूनच तर कोणत्याही देशातील लोकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारुन तसेच विज्ञानवादी विचारांना प्रमाण मानून त्यांचे प्रतिबिंब आपल्या विचारात व शक्यतो कृतीत उतरणे आवश्यक आहे.

मानवाच्या विचारावर जर अनिष्ट चालीरीती व अवैज्ञानिक, अशास्त्रीय विचारांचा पगडा किंवा प्रभाव असेल तर व्यक्ती साहजिकपणे त्याच्या खऱ्या विकासापासून निश्चितच दूर लोटल्या जातो. खरी प्रगती साध्य करण्यासाठी मानवाने त्याने प्राप्त केलेल्या औपचारिक व अनौपचारिक शिक्षणातून वस्तुनिष्ठ व शास्त्रीय विचारांना प्रमाण मानावे. भारताला विकसनशील देशाला विकसित करुन जगामध्ये भारत राष्ट्राला बलशाली राष्ट्रांच्या पंगतीत बसवायचे असेल तर ते विज्ञानवादी विचारानेच केवळ साध्य होईल. व भारतातील तमाम महान नेत्यांचे, समाजसुधारकांचे स्वप्न साकार होईल. यासाठी समाजातील प्रत्येक घटक महत्वाचा आहे. खास करुन विद्यार्थ्यांवर ती जबाबदारी मोठ्या प्रमाणावर आहे. त्याकरिता
आजच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी विचारांची कास धरुन अंधश्रद्धेच्या विचारांना मूठमाती द्यावी हे सर्व काम विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन पूर्ण करावे.

संशोधनाचा अभ्यास केला असता प्रत्येक क्षणोक्षणी नवनवीन संशोधने होताना आपल्याला दिसून येतात. त्यामुळे जगात, राष्ट्रात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. नवनीवन संकल्पना समोर येत आहे आणि मानव आपला विकास साध्य करताना दिसून येत आहे.

परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, आजही आपल्या राष्ट्रामध्ये जादुटोना, भुताटकी, करणी, नरबळी, दैवीशक्ती अशा विविध प्रकारच्या अंधश्रद्धा पहायला मिळत आहेत. खास करुन समाजातील विशिष्ट घटकांमध्ये ह्या अंधश्रद्धा आजही मोठ्या प्रमाणावर पहायला मिळतात तो समाज म्हणजे अनुसूचित जमातीतील आहे. त्याला एकमेव कारण आहे ते म्हणजे त्यांच्या समाजामध्ये शिक्षणाचा अभाव असल्यामुळे निरक्षर व्यक्तींची संख्या आजही त्यासमाजामध्ये मोठ्या प्रमाणावर पहायला मिळत आहे. त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आज थोड्या फार प्रमाणात त्या समाजातील युवक शिक्षण घेण्याचा प्रयत्न करताना दिसून येत असले तरी त्यांच्यावर देखील अंधश्रद्धेचा काही प्रभाव आहे किंवा नाही असेल तर कोणकोणत्या प्रकारचा आहे याचा अभ्यास करण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.

**गृहितके :**

1. अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.
2. अनुसूचित जमातीतील लोकसंख्येत निरक्षरता जास्त आहे.

**उद्दिष्टे :**

1. अनुसूचित जमातीतील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
2. अनुसूचित जमातीतील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील अंधश्रद्धेचा शोध घेणे.
3. अनुसूचित जमातीतील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धा कमी करण्यासाठी शिफारशी सुचविणे.

**परिकल्पना :**

अनुसूचित जमातीतील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रद्धा आहे.

**संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श :**

**1. जनसंख्या :**

न्यादर्श अभ्यासात ज्यांच्याविषयी किंवा ज्यांच्या माहितीच्या साहयाने निष्कर्ष काढावयाच्या असतात त्या सर्व व्यक्तीच्या समूहाला जनसंख्या म्हणतात. सदर संशोधन पेपरसाठी बीड शहरातील महाविद्यालयीन शिक्षण घेणारा अनुसूचित जमातीतील विद्यार्थी ही जनसंख्या आहे.

**2. न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये न्यादर्श म्हणून संशोधिकेने बीड शहरातील 50 अनुसूचित जमातीतील महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली.

**कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधन पेपर तयार करण्यासाठी संशोधिकेने सुरुवातीला आराखडा तयार केला. त्यामुळे संशोधन पेपर करण्यास एक निश्चित दिशा प्राप्त झाली. त्यानंतर संशोधिकेने संबंधित साहित्य व गत संशोधनाचा आढावा घेतला त्याचा अभ्यास केला. त्यानंतर संशोधिकेने बीड शहरातील अनुसूचित जमातीच्या महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांपैकी 50 विद्यार्थ्यांची संशोधनात न्यादर्श म्हणून निवड केली. त्यानंतर शेकडेवारी या सांख्यिकीय परिमाणांच्या आधारे माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन केले व त्यावरुन निष्कर्ष व शिफारशी सुचविण्यात आल्या.

**निष्कर्ष :**

1. विद्यार्थी शुभ अशुभ कल्पना मानतात.
2. आजही बहुतांश विद्यार्थी घरात किंवा वाहनाला नजर लागू नये म्हणून घराला लिंबू, मिरची व काळी बाहूली लावतात.
3. आजही बहुतांश विद्यार्थ्यांच्या मते वर्तमानपत्रातील जे राशी भविष्य असते ते सत्य ठरत असते.
4. बहुतांश विद्यार्थ्यांच्या मते, भविष्य हे जन्म मुहूर्तावर अवलंबून असते.
5. बहुतांश विद्यार्थी आजही त्यांना दैनंदिन जीवनात समस्या असल्यास ज्योतिषी, किंवा बाबांकडे जातात.
6. बहुतांश विद्यार्थ्यांनी त्यांच्या समस्यांच्या बाबतीत बुवाबाबांनी सांगितलेला उपाय केलेला आहे.
7. बहुतांश विद्यार्थ्यांची अशी धारणा आहे की, बुवाबाबांनी सांगितलेल्या उपायांनी अडचणी कमी झाल्या आहेत.
8. आजही बहुतांश विद्यार्थ्यांच्या मते नवसाने मुलगा होतो ही धारणा आहे.

9. विद्‌यार्थ्यांच्या मते जर एखादी वाईट किंवा दु:खद घटना घडली तर त्यामागे अमानवी शक्ती आहे असे ते मानतात.
10. बहुतांश विद्‌यार्थ्यांच्या मते हाताला किंवा पायाला काळादोरा किंवा ताईत बांधले तर सर्व काही मनासारखे होते.
11. बहुतांश विद्‌यार्थ्यांचा कोणतेही चांगले काम करायचे झाल्यास मुहूर्ताचा विचार करतात.
12. ह्या सर्वअंधश्रद्‌धेच्या मागे एकमेव कारण आहे ते म्हणजे त्यांची असलेली निरक्षरता म्हणजेच त्यांच्याकडे असलेल्या शिक्षणाचा अभाव होय.

**शिफारशी :**

1. ह्या विद्‌यार्थ्यांमध्ये शिक्षकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवायला हवा. त्या करिता महाविद्‌यालयीन स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करावे.
2. ह्या समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवावे. प्रौढशिक्षणाच्या साहयाने ह्या समाजातील निरक्षरता दूर करावी.
3. महाविद्‌यालयीन विद्‌यार्थ्यांसाठी व्यक्तीमत्त्व शिबीरांचे आयोजन करावे.
4. महाविद्‌यालयीन विद्‌यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी प्राचार्य, प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत.
5. ह्या जमातीतील विद्‌यार्थ्यांना महाविद्‌यालयीन कार्यक्रमामध्ये शिक्षकांनी त्यांचा सहभाग घ्यावा.
6. महाविद्‌यालयामध्ये ह्या विद्‌यार्थ्यांच्या संस्कृतीचा आदर करावा.
7. अनुसूचित जमातीतील विद्‌यार्थ्यांसाठी त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण द्‌यावे.
8. महाविद्‌यालयीन स्तरावर अंधश्रद्‌धा निर्मूलन शिबीरांचे आयोजन करावे. त्यामुळे ह्या विद्‌यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्‌यावे.
9. महाविद्‌यालयामध्ये शिक्षकांनी विविध अंधश्रद्‌धाबद्‌दल भितीपत्रके, पोस्टर, निबंध स्पर्धांचे आयोजन करावे.

**समारोप :**

अशा प्रकारे अनुसूचित जमातीतील विद्‌यार्थ्यांमध्ये असलेल्या अंधश्रद्‌धा विचारांचा अभ्यास संशोधिकेने केला आहे व त्यांचे निष्कर्ष काढून शिफारशी सुचविल्या आहेत.

**संदर्भग्रंथसूची :**

1. पंडित, बी.बी. (2005). शिक्षणातील संशोधन, नित्य नुतन प्रकाशन, पुणे
2. भितांडे, वि.रा. (2007).शैक्षणिक संशोधन, नित्य नुतन प्रकाशन, पुणे
3. मुळे, रा. शं. व उमाठे, वि. तू., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, नुतन प्रकाशन, नागपूर (1998)
4. दाभोलकर ह. न., प्रश्न मनाचे, राजहंस प्रकाशन, पुणे
5. देशमुख, म. पाऊले चालती परिवर्तनाची वाट, अनुपम क्रिएशन, पुणे
6. अंधश्रद्‌धा निर्मूलन वार्तापत्र, RNI No : 0973-2845.
7. साने, मा. (1986), आदिवासी शोध व बोध, सरस्वती प्रकाशन, पुणे